# प्रेस नोट - वडाळा पोलीस ठाणे, मुंबई

दिनांक ०५/०६/२०२२

## वडाळा पोलीस ठाणे गु.र.क. १८२९२२ कलम ३०२ भा.द.वि. मधील आरोपींचा २४ तासांचे आत शोध घेवून गुन्हा उघड...

महिला नामे निर्मला विजय ठाकुर, वय ४२ वर्षे, रा. ठि. पंचशिलनगर, आनंदवाडी सॉल्ट पॅन रोड, वडाळा पूर्व, मुंबई ३७ यांचा दिनांक ०४/०६/२०२२ रोजी रात्री १ वा. ते ५.४५ वा. चे दरम्यान अज्ञात इसमाने डोक्यात धार धार शास्त्राने वार करून खुन केल्याने विजय गजाजन ठाकुर, वय ५० वर्षे यांचे फिर्यादीवरुन वडाळा पोलीस ठाणे गु.र.क्र. १८२ / २२ कलम ३०२ भा. द. वि. हा गुन्हा नोंद करण्यात आला.

नमुद गुन्हा उघड करणेसाठी मा. पोलीस सह आयुक्त का.व सु., मा अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशीक विभाग, मा. पोलीस उपायुक्त बंदर परिमंडळ, मा. सहायक पोलीस आयुक्त वडाळा विभाग, प्र. व. पो. नि. सो यांचे मार्गर्शनखाली तपासी अधिकारी पो. नि. काळडोके, पो. नि. उगले, पो.नि. माने, स.पो.नि. खुळे, पो. उ. नि. रणवरे यांचे नेतृत्वात पथके तयार करून, मा. पोलीस उपायुक्त बंदर परिमंडळ व सहायक पोलीस आयुक्त वडाळा विभाग यांनी घटनास्थळी भेट देवुन नमुद गुन्हयाच्या तपासात सुचना दिल्या व मागदर्शन केले.

मिळालेल्या तांत्रिक पुराव्याच्या आधारे, तसेच कुटुंबियांकडे केलेल्या कसुन चौकशीवरून, सदर गुन्हा हा मयत महिलेची दोन मुले व मोठया मुलाची मैत्रीण यांनी केल्याचे निष्पन्न झाले. आरोपींची नावे १ ) अक्षय विजय ठाकुर वय २५ वर्षे रा. ठि. पंचशिलनगर, आनंदवाडी सॉल्ट पॅन रोड वडाळा पूर्व, मुंबई ३७ २) कु. कोमल दत्तात्रय भोईलकर वय २२ वर्षे रा. ठि. वर्तकनगर, शिवसेना शाखेच्या पाठीमागे, ठाणे पश्चिम व विधीसंघर्षग्रस्त बालक वय १५ वर्षे.

तपासादरम्यान निर्मला विजय ठाकुर या त्यांच्या कुटुंबात काळी जादु करून करणी करतात व कुटुंबातील व्यक्तीना वश करतात, तसेच मोठा मुलगा अक्षय विजय ठाकुर वय २५ वर्षे व कोमल दत्तात्रेय भोईलकर वय २२ वर्षे यांचा विवाह न होणेसाठी करणी करतात याचा संशय मनात असल्याने अक्षय ठाकुर हा निर्मला ठाकुर यांचेशी सतत भांडत असे त्या भांडणाचा राग मनात धरून अक्षय विजय ठाकुर, कु. कोमल दत्तात्रेय भोईलकर व विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी निर्मला विजय ठाकुर यांचा खुन केल्याचे निष्पन्न झाले आहे.

नमुद गुन्हयातील आरोपींना अटक करणेसाठी उत्कृष्ट तांत्रिक व पारंपारिक तपास करून चांगली कामगीरी करणारे अधिकारी व अंमलदार यांची यादी.

पो. नि. काळडोके, पो. नि. उगले, पो. नि. माने, स.पो.नि. स्नेहलसिंह खुळे, पो.उ.नि. रणवरे पो.उ.नि. जगदाळे, पोउनि. काळे, पोउनि दगडे, पो.ना. ०३१०४३३भोसले, पो.ना. ०४०३३०६पुजारी, पो.ना. देशमुख, पो. शि. ०६०४०४ /दहिफळे, पो.शि. ०९९४०/मोडक, पो.शि. ०९३३८० / जमादार, पो.शि. ११३४१४/बाबर, पो. शि. ११३२०४ /साळवे, पो.शि. ११३१६७/गोपाळे, पो.शि. १११६६१/ जाधव, पो.शि. १४०२९०/काटे.